केंद्र पुरस्कृत बहुक्षेत्र विकास कार्यक्रमातंर्गत (MsDP) मान्यता प्राप्त बीड जिल्ह्यातील परळी शहर येथील मान्यता प्राप्त विकासकामांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र-राज्य हिश्यांतर्गत मंजूर उर्वरित ५०% अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अविवि-२०१३ /प्र.क्र.१७८/का.०७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: - १० /१०/२०१७

<u>**संदर्भ:**</u> - (१) अवर सचिव, अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.३/१३(२) क्ष (३) /२०१३-PP, दि.२९/१०/२०१४.
(२) शासन ज्ञापन, अल्पसंख्याक विकास विभाग, समक्रमांकित, दि.२७ मार्च, २०१५.
(३) शासन ज्ञापन, अल्पसंख्याक विकास विभाग, समक्रमांकित, दि.२७ मार्च, २०१५.
(४) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, समक्रमांकित, दि.३१ मार्च, २०१५.
(५) जिल्हाधिकारी,बीड यांचे पत्र क्र.२०१५/ जिबी-डेस्क-/ संकीर्ण/ अल्पसंख्यांक/ वसतीगृह, दि. १८/०२/२०१७.
(६) अवर सचिव, अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.३/ १३(३)/ २०१३-PP, दि.१९/०९/२०१७.

<u>**प्रस्तावना**</u> :-

१२ व्या पंचवार्षिक योजनेत केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाच्या बहुक्षेत्रिय विकास कार्यक्रमांतर्गत (MsDP) गठित शक्तिप्रदान समितीने दि.०१/०९/२०१४ रोजीच्या ८९ व्या बैठकीत बीड जिल्ह्यातील परळी शहर येथे मुलांसाठी व मुलींसाठी १०० प्रवेश क्षमतेचे प्रत्येकी ०१ याप्रमाणे एकूण ०२ वसतीगृह इमारत बांधकामासाठी एकूण रु.२३२.५० लाख इतक्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने संदर्भ क्र. (७) येथील आदेशाद्वारे MsDP अंतर्गत विषयांकित गटातील मान्यताप्राप्त विकास कामांच्या अंमलबजावणीसाठी मंजूर केंद्र हिश्श्यातील पहिल्या टप्प्यातील एकूण रु. २३२.५० लक्ष इतकी रक्कम तसेच संदर्भ क्र. (६) अन्वये राज्य हिश्श्यातील रु. ७७.५० लक्ष इतकी रक्कम जिल्हाधिकारी, बीड यांना मंजूर करुन वितरित करण्यात आली आहे. संदर्भ क्र. (४) येथील शासन निर्णयांन्वये बीड जिल्ह्यातील विषयांकित परळी शहर, जिल्हा बीड येथे मुलांसाठी व मुलींसाठी १०० प्रवेश क्षमतेचे प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ०२ वसतीगृह बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

आता संदर्भ क्र. (५) येथील पत्रातील विनंतीस अनुसरुन, केंद्र शासनाकडून संदर्भ क्र. (६) येथील पत्रान्वये मंजूर करण्यात आलेली केंद्र हिश्श्यातील उर्वरित ५०% रक्कम बीड जिल्ह्यातील परळी शहरातील मुलांसाठी व मुलींसाठी १०० प्रवेश क्षमतेचे प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ०२ वसतीगृह बांधकामासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांना निधी मंजूर करुन वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय:-**</u>

केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाकडून संदर्भ क्र. (६) येथील पत्रान्वये केंद्र हिश्श्यातील उर्वरित ५०% म्हणजेच रु.२३२.५० लक्ष तसेच राज्य हिश्श्यातील उर्वरित रु.७७.५० लक्ष इतकी रक्कम बीड जिल्हयातील परळी शहर येथे विषयांकीत बांधकामांसाठी मंजूर करण्यात आली आहे. सदरहू रक्कम जिल्हाधिकारी बीड यांना खालील तक्त्यातील स्तंभ क्र. (१०) व (११) प्रमाणे मंजूर करुन वितरित करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे :-

(Rs. lakhs)

Sl. No.	Name of project	No. of units	Unit Cost	Sharing ratio	Central share	State share	Total cost	GOI 1st install. Released	GOM 1st install. Released	2nd instalment to be released (GOI)	2nd instalment to be released (GOM)
	1	2	3	4	5	6	7	8	9	10	11
1	Construction of 100 Bedded Boys Hostel	01	310.00	50:50	155.00	155.00	310.00	77.50	77.50	77.50	77.50
2	Construction of 100 Bedded Girls Hostel	01	310.00	100:00	310.00	0.00	310.00	155.00	0.00	155.00	0.00
3	**Total**	**02**	**620.00**		**465.00**	**155.00**	**620.00**	**232.50**	**77.50**	**232.50**	**77.50**

४. उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्र.(१०) प्रमाणे सन २०१६-१७ या वर्षात बहुक्षेत्रिय विकास कार्यक्रमांतर्गत बीड जिल्ह्यातील परळी शहर येथील विकासकामांसाठी उर्वरित रु.२३२.५० लाख (रुपये दोन कोटी बत्तीस लाख पन्नास हजार मात्र) तसेच राज्य हिश्श्यातील रु ७७.५० लाख (रूपये सत्त्याहत्तर लाख पन्नास हजार मात्र) एवढी रक्कम जिल्हाधिकारी, बीड यांना सुपूर्द करण्यात येत असून याकरिता ते आहरण व संवितरण अधिकारी आणि नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील.

५. सन २०१७-१८ या वर्षात जिल्हाधिकारी, बीड यांना उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्र.(१०) व (११) प्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या एकूण रकमेच्या मर्यादेत अर्थसंकल्प वितरण प्रणालीतून सदर रक्कम आहरित व संवितरित करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, बीड यांनी बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रमांतर्गत विषयांकित मुलांसाठी व मुलींसाठी १०० प्रवेश क्षमतेचे प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ०२ वसतीगृह इमारत बांधकाम या योजनेकरीता आहरित केलेली रक्कम संबंधित अमंलबजावणी यंत्रणेस रितसर वितरित करावी.

६. केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाच्या दि.१६/०२/२०१५ रोजीच्या पत्रातील सूचनांनुसार बहुक्षेत्रिय विकास कार्यक्रमाअंतर्गत (MsDP) वितरीत करण्यात येणा-या निधीस VAT वा कोणत्याही प्रकारचे विभागीय कर लागू राहणार नाहीत.

७. सदरचा खर्च करण्यास वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत C.V.C च्या मार्गदर्शक तत्वानुसार / CAG च्या निर्देशानुसार कोणताही शासन निर्णय / अटी व शर्तीचा भंग होणार नाही, याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावी. सदर रक्कम वितरित करण्यापूर्वी संबंधित जिल्हाधिकारी यानी शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय / कार्यालयीन आदेश / वित्तीय नियमावली / सार्वजनिक बांधकाम विभागाची कार्य नियमावली / भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे निरिक्षण अहवाल / वित्तीय कार्यपध्दती यांचा अवलंब करावा. तसेच सदर रक्कम चालू आर्थिक वर्षात उपयोगात आणणे आवश्यक राहील. सदर निधी कोणत्याही संस्थेत ठेव स्वरुपात जमा करता येणार नाही.

८. अमंलबजावणी यंत्रणा यांनी विषयांकीत मुलांसाठी व मुलींसाठी १०० प्रवेश क्षमतेचे प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ०२ वसतीगृह बांधकामासाठी केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीच्या विनियोगाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे तसेच त्रैमासिक अहवाल (QPR) विहित नमुन्यात (अद्ययावत छायाचित्रांसह) संबंधीत जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शासनास सादर करावीत. तसेच विभागाच्या Construction tracker प्रणालीवर देखील विषयांकीत वसतीगृह बांधकामाची माहिती वेळोवेळी upload करावी.

९. जिल्हाधिकारी, बीड यांनी मुलांसाठी व मुलींसाठी १०० प्रवेश क्षमतेचे प्रत्येकी एक याप्रमाणे एकुण ०२ वसतीगृह बांधकामासाठी निधी मागणीच्या प्रस्तावासोबत वरीलप्रमाणे विहित नमुन्यातील निधीच्या विनियोगाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे तसेच त्रैमासिक अहवाल (QPR) (अद्ययावत छायाचित्रासह) शासनास सादर करावीत.

१०. सदर योजनेंतर्गत केंद्र हिश्श्यावर होणारा खर्च "मागणी क्र.झेड ई-१, मुख्यलेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम, केंद्र पुरस्कृत योजना (००) (१७) अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी बहुक्षेत्रीय विकास योजना, (केंद्र हिस्सा) (२२३५- ए ५४३) ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली व राज्य हिश्श्यावर होणारा खर्च "मागणी क्र.झेड ई-१, मुख्यलेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम, केंद्र पुरस्कृत योजना (०१) (१४) अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी बहुक्षेत्रीय विकास योजना, (राज्य हिस्सा) (२२३५-ए २३१) ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)" मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

११. हा शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०/०६/२०१७ अन्वये प्रशासनिक विभागांस प्रदान करण्यात आलेल्या अधिकांरानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१७१०१०१७१६११००१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Hari Gaikwad

Digitally signed by Ashok Hari Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=MINORITY DEVELOPMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9bcd09896471a6f90b80581ca42d45e27f07ad7e99a45bec3a7579cf10330fcd, cn=Ashok Hari Gaikwad
Date: 2017.10.11 14:42:53 +05'30'

(अशोक गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत

१.मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग (बांधकामे),मंत्रालय,मुंबई.
३. विभागीय आयुक्त, औरंगाबाद.
४. जिल्हाधिकारी, बीड
५. मुख्याधिकारी, परळी नगर परिषद.
६.महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
७.महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व परीक्षा) मुंबई/नागपूर.
८.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद
९.अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद
१०.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अंबाजोगाई
११.सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नविन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मुंबई
१२.जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा बीड.
१३.वित्त विभाग (अर्थसंकल्प -४/ व्यय -४) मंत्रालय, मुंबई.
१४.नियोजन विभाग (कार्या.१४७५) मंत्रालय, मुंबई.
१५.निवडनस्ती,(का.७).